**L. A. BILL No. XIX OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९.**

**अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५५ चा १०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी ५४८—१ (८४०—७-२०२१)

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५५ चा १०.

"(१ख) पोट-कलम (१क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असणारी असाधारण परिस्थिती असताना आदेशाद्वारे, साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करील किंवा त्यास प्रतिबंध करील.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

संसदेने, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, अशी कडधान्ये, डाळी, बटाटा, कांदे, खाद्य तेलबिया व तेल यांचा अंतर्भाव असेल अशा अन्नपदार्थांचा पुरवठा युद्ध, दुष्काळ, असाधारण किंमतवाढ आणि गंभीर स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेली असाधारण परिस्थिती असतांनाच केवळ विनियमित करता येईल यासाठी तरतूद करण्याकरिता, अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २०२० (२०२० चा केंद्रीय अधिनियम-क्रमांक २२), (यात यापुढे ज्याचा निर्देश "केंद्रीय अधिनियम" असा करण्यात आला आहे), द्वारे अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ (१९५५ चा केंद्रीय अधिनियम क्रमांक १०) यामध्ये सुधारणा केली आहे.

२. केंद्रीय अधिनियमामध्ये दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेल्या असाधारण परिस्थितीमध्ये साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करण्यासाठी किंवा त्यास प्रतिबंध करण्यासाठी राज्य शासनाकरिता कोणतीही तरतूद नाही.

३. दुष्काळ, किंमतवाढ, नैसर्गिक आपत्ती यांचा अंतर्भाव असलेल्या असाधारण परिस्थितीमध्ये साठा मर्यादा लादून, उत्पादन, पुरवठा, वितरण विनियमित करण्याचा किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्याकरिता, महाराष्ट्र शासनास, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्याच्या कलम ३ मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ६ जुलै, २०२१.

**छगन भुजबळ,**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १(३).**—या खंडान्वये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा उपरोल्लिखित प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक १९ अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

### (अत्यावश्यक वस्तू अधिनियम, २०२० यातील उतारे)

### (सन २०२० चा अधिनियम क्रमाक २२)

**१.** ते **२.** * * * *

**३.** (१) जर कोणत्याही अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी अथवा त्यांच्या न्यायोचित वितरणाची आणि रास्त किंमतीला त्या उपलब्ध होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी [४][अथवा भारताच्या संरक्षणाकरता किंवा लष्करी कामगि-यांच्या कार्यक्षम संचालनाकरता एखाद्या अत्यावश्यक वस्तूंची सुनिश्चिती करण्यासाठी] तसे करणे आवश्यक किंवा समयोचित आहे असे जर केंद्र शासनाचे मत असेल तर, केंद्र शासनाला आदेशाद्वारे तिचे उत्पादन, पुरवठा व वितरण आणि तद्विषयक व्यापार व वाणिज्य यांचे विनियमन करण्याचा किंवा ते मना करण्याचा उपबंध करता येईल. अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन, पुरवठा, वितरण, इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार.

‘‘(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी अन्नसामग्री तसेच, तृणधान्ये, कडधान्ये, बटाटे, कांदे, खाद्य तेलबिया आणि खाद्य तेले यांचा पुरवठा, केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्येच विनियमित करता येईल, त्या परिस्थितीमध्ये युद्ध, दुष्काळ, अभूतपूर्व किंमत वाढ आणि गंभीर स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती यांचा समावेश असेल ;

(ख) साठ्यावर मर्यादा लादणारी कोणतीही कार्यवाही ही, किंमत वाढीवर आधारित असेल आणि, निकटपूर्वीच्या बारा महिन्यांमध्ये प्रचलित असलेली किंमत, किंवा मागील पाच वर्षांमधील सरासरी किंमत, यापैकी जी अधिक असेल त्यापेक्षा, जर—

(एक) फळबागायत मालाच्या किरकोळ किंमतीत शंभर टक्के इतकी वाढ झाली असेल; किंवा

(दोन) अनाशिवंत कृषि अन्नसामग्रीच्या किरकोळ किंमतीत पन्नास टक्के इतकी वाढ झाली असेल,

तरच फक्त अशा कोणत्याही कृषि मालाच्या साठ्यावरील मर्यादेचे विनियमन करण्याचा आदेश, या अधिनियमान्वये देता येईल :

परंतु, जर एखाद्या प्रक्रियाकाराची किंवा कोणत्याही कृषि मालाच्या मूल्य साखळीतील भागीदार व्यक्तीची साठा धारण मर्यादा ही, प्रक्रियेच्या स्थापित क्षमतेच्या एकूण कमाल मर्यादेपेक्षा, किंवा एखाद्या निर्यातकाच्या बाबतीत, निर्यातीच्या मागणीपेक्षा अधिक नसेल तर, अशा व्यक्तींना, साठा धारण मर्यादेचे विनियमन करण्याबाबतचा असा आदेश लागू होणार नाही :

परंतु, आणखी असे की, या पोटकलमात अंतर्भूत केलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंतर्भूत असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये केलेली सार्वजनिक वितरण व्यवस्था किंवा लक्ष्यित सार्वजनिक वितरण व्यवस्था यासंबंधीच्या कोणत्याही आदेशाला लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण** - कोणत्याही कृषि मालाच्या संबंधात, ‘‘ मूल्य साखळीतील भागीदार व्यक्ती ’’ या शब्दप्रयोगाचा अर्थ, जेथे प्रत्येक टप्प्यावर उत्पादनाची मूल्यवाढ होते, अशा प्रक्रिया, आवेष्टन, साठवणूक, परिवहन आणि वितरण यांच्याशी संबंधित असा, क्षेत्रातील कोणत्याही कृषि मालाच्या उत्पादनापासून ते अंतिम उपभोगापर्यंतच्या साखळीतील भागीदार व्यक्तींचा वर्ग, असा असून त्यात त्याचा समावेश आहे.

(२) ते (६) * * * *

**४.** ते **१६.** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९. ]**

**[ अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. छगन भुजबळ,**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई